भारत सरकार

**विधि व न्याय मंत्रालय**

सत्यमेव जयते

# राष्ट्रीय पर्यावरण न्यायाधिकरण अधिनियम, १९९५

**(सन १९९५ चा अधिनियम क्रमांक २७)**

[ ६ ऑगस्ट, २००६ रोजी यथाविद्यमान ]

# The National Environment Tribunal Act, 1995

**(Act No. 27 of 1995)**

[*As in force on the 6th August, 2006*]

संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले

२००८

**[किंमत :** रुपये ३२.००]

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक ६ ऑगस्ट, २००६ रोजी यथाविद्यमान असलेला दि नेशनल एनव्हायर्नमेंट ट्रिब्युनल ॲक्ट, १९९५ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र**, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड १५, अंक २, दिनांक ९ नोव्हेंबर, २००६ यात पृष्ठ १४९ ते १६० मध्ये प्रकाशित करण्यात आला होता.

हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक ९ नोव्हेंबर, २००६.

**टी. के. विश्वनाथन,**
सचिव, भारत सरकार.

## PREFACE

This edition of the The National Environment Tribunal Act, 1995 as on the 6th August, 2006 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in *Gazette of India*, Extraordinary, Part XII, Section 1, No. 2, Vol. 15, dated 9th November 2006 on pages 149 to 160.

This authoritative text was published under the authority of the President under Section 2, Clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi,
Date 9th November, 2006

T. K. VISWANATHAN,
Secretary to the
Government of India.

# राष्ट्रीय पर्यावरण न्यायाधिकरण अधिनियम, १९९५

## कलमांचा क्रम

कलमे


प्रकरण एक

**प्रारंभिक**

१. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

२. व्याख्या.

प्रकरण दोन

**एखाद्या व्यक्तीचा मृत्यू, तिला झालेली इजा आणि मालमत्ता व पर्यावरण यांची हानी यासाठी नुकसानभरपाई**

३. दोष नसताना तत्त्वानुसार काही विवक्षित प्रकरणात नुकसानभरपाई देण्याचे दायित्व.

४. नुकसानभरपाईच्या मागणीबाबतचा अर्ज.

५. न्यायाधिकरणाची कार्यपद्धती व अधिकार.

६. अंतरिम आदेश देण्याबाबतच्या शर्ती.

७. कोणत्याही अन्य कायद्यान्वये प्रदान केलेल्या सहाय्याची रक्कम कमी करणे.

प्रकरण तीन

**राष्ट्रीय पर्यावरण न्यायाधिकरण आणि त्याची न्यायपीठे यांची स्थापना**

८. राष्ट्रीय पर्यावरण न्यायाधिकरणाची स्थापना.

९. न्यायाधिकरण व त्याची न्यायपीठे यांची रचना.

१०. अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष किंवा अन्य सदस्य म्हणून नियुक्ती होण्यासाठी अर्हता.

११. विवक्षित परिस्थितीत उपाध्यक्षाने, अध्यक्ष म्हणून काम पाहणे किंवा त्याची कर्तव्ये पार पाडणे.

१२. पदावधी.

१३. राजीनामा व पदावरून काढून टाकणे.

१४. अध्यक्ष,उपाध्यक्ष आणि अन्य सदस्य यांचे वेतन व भत्ते आणि सेवेच्या अन्य अटी व शर्ती.

१५. असा अध्यक्ष, इत्यादी असण्याचे बंद झाल्यावर अध्यक्ष, इत्यादींनी पद धारण करण्या-संबंधीची तरतूद.

१६. अध्यक्षाचे आर्थिक व प्रशासनिक अधिकार.

१७. न्यायाधिकरणाचा कर्मचारीवर्ग.

१८. कामकाजाचे न्यायपीठांमध्ये वितरण.

प्रकरण चार

**न्यायाधिकरणाची अधिकारिता व कार्यपद्धती**

१९. अधिकारितेस आडकाठी.

२०. एका न्यायपीठाकडून अन्य न्यायपीठाकडे खटल्याचे हस्तांतरण करण्याचे अध्यक्षाचे अधिकार.

२१. निर्णय बहुमताने घेण्यात येईल.

२२. पर्यावरणाच्या हानीसाठी देय असलेली रक्कम जमा करणे.

२३. न्यायाधिकरणाच्या निवाड्याची किंवा आदेशाची अंमलबजावणी.

२४. अपिले.

प्रकरण पाच

**संकीर्ण**

२५. न्यायाधिकरणाच्या आदेशाचे पालन करण्यात कसूर झाल्यास शास्ती.

२६. कंपन्यांनी केलेले अपराध.

२७. न्यायाधिकरणापुढील कार्यवाही ही न्यायिक कार्यवाही असेल.

२८. न्यायाधिकरणाचे सदस्य आणि कर्मचारी हे लोकसेवक असणे.

२९. सद्भावनेने केलेल्या कृतीस संरक्षण.

३०. अधिनियमाचा अधिभावी प्रभाव असणे.

३१. नियम करण्याचा अधिकार.

**अनुसूची**

इंग्रजी-मराठी शब्दसूची

मराठी-इंग्रजी शब्दसूची

# राष्ट्रीय पर्यावरण न्यायाधिकरण अधिनियम, १९९५

**(१९९५ चा अधिनियम क्रमांक २७)**

(६ ऑगस्ट २००६ रोजी यथाविद्यमान)

[१७ जून १९९५]

**कोणताही घातक पदार्थ हाताळताना होणाऱ्या कोणत्याही अपघातातून झालेल्या हानीचे काटेकोर दायित्व सोपविण्याकरिता आणि व्यक्तींना, मालमत्तेला व पर्यावरणाला पोहोचलेल्या हानीबद्दल सहाय्य व नुकसानभरपाई देण्याच्या दृष्टीने, अशा अपघातातून उद्‌भवलेली प्रकरणे प्रभावीपणे आणि शीघ्रतेने निकाली काढण्यासाठी एक राष्ट्रीय पर्यावरण न्यायधिकरण स्थापन करण्याकरिता आणि त्याच्याशी संबंधित किंवा आनुषंगिक बाबींकरिता तरतूद करण्यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** ज्यात भारत सहभागी झाला होता अशा रिओ-डी-जानीरो येथे जून १९९२ मध्ये भरलेल्या पर्यावरण व विकास यांवरील संयुक्त राष्ट्र परिषदेत प्रदुषणाचे बळी व अन्य पर्यावरणविषयक हानी यांचे दायित्व व नुकसानभरपाई यांच्या संबंधात राष्ट्रीय कायदे विकसित करण्यास राष्ट्रांना फर्माविण्याविषयी निर्णय घेण्यात आला होता ;

**आणि ज्याअर्थी,** उक्त परिषदेचे निर्णय, जेथवर ते घातक पदार्थ हाताळताना, पर्यावरणाचे संरक्षण आणि व्यक्ती, मालमत्ता व पर्यावरण यांना पोहचणाऱ्या हानीबद्दल नुकसानभरपाई देणे यांच्याशी संबंधित आहेत तेथवर, त्यांची अंमलबजावणी करणे इष्ट आहे असे वाटते ;

**त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सेहेचाळीसाव्या वर्षी, संसदेद्वारे तो पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :-----

## प्रकरण एक

## प्रारंभिक

**१.** (१) या अधिनियमास, "राष्ट्रीय पर्यावरण न्यायाधिकरण अधिनियम, १९९५" असे म्हणावे ; **संक्षिप्त नाव व प्रारंभ.**

(२) तो, केंद्र सरकार, अधिसूचनेद्वारे नियत करील त्या तारखेस किंवा तारखांना अंमलात येईल आणि निरनिराळया राज्यांसाठी निरनिराळया तारखा नियत करता येतील आणि या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीतील वा अधिनियमाच्या प्रारंभाच्या कोणत्याही संदर्भाचा, कोणत्याही राज्याच्या किंवा त्याच्या भागाच्या संबंधातील अन्वयार्थ त्या राज्यात किंवा त्याच्या भागात ती तरतूद अंमलात आल्याचा संदर्भ म्हणून लावण्यात येईल.

**२.** या अधिनियमास, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,— **व्याख्या.**

(क) "अपघात" याचा अर्थ, कोणताही घातक पदार्थ हाताळताना, आकस्मिकपणे किंवा अचानकपणे किंवा अहेतुकपणे घडलेली आणि कोणत्याही व्यक्तीचा मृत्यू किंवा तिला इजा होण्याचा किंवा कोणत्याही मालमत्तेचे किंवा पर्यावरणाचे नुकसान होण्याचा सतत किंवा अधूनमधून किंवा पुन्हा पुन्हा धोका उद्‌भवण्यात परिणत होणारी अशी घटना, असा आहे.परंतु, त्यात केवळ युद्ध किंवा किरणोत्सारण क्रियेच्या कारणाने झालेल्या अपघाताचा समावेश नाही ;

(ख) "न्यायपीठ" याचा अर्थ, न्यायाधिकरणाचे न्यायपीठ, असा आहे ;

(ग) "अध्यक्षपदस्थ व्यक्ती" याचा अर्थ, न्यायाधिकरणाचा अध्यक्ष, असा आहे ;

(घ) "पर्यावरण" यात पाणी, हवा व जमीन आणि पाणी, हवा व जमीन आणि मनुष्यप्राणी, अन्य सजीव प्राणी, झाडे, सूक्ष्म जीव व जीवनसंपत्ती, यांच्यामध्ये आणि त्यांच्या दरम्यान असलेला परस्पर संबंध, यांचा समावेश आहे ;

(ङ) कोणत्याही घातक पदार्थाच्या संबंधात, "हाताळणे" याचा अर्थ, अशा घातक पदार्थाची निर्मिती करणे, संस्करण करणे, प्रक्रिया करणे, तो आवेष्टित करणे, त्याची साठवण करणे, वाहनाने वाहतूक करणे, त्याचा वापर करणे, संग्रह करणे, नाश करणे, त्याचे रूपांतरण करणे, तो विक्री, हस्तांतरण किंवा तत्सम अन्य प्रकारासाठी देऊ करणे, असा आहे ;

(च) "घातक पदार्थ" याचा अर्थ, पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६ (१९८६ चा २९) मध्ये घातक पदार्थ म्हणून व्याख्या केली आहे असा आणि लोक दायित्व विमा अधिनियम, १९९१ (१९९१ चा ६) अन्वये केंद्र सरकारने विनिर्दिष्ट केलेल्या अशा प्रमाणापेक्षा अधिक प्रमाणात असेल असा कोणताही पदार्थ किंवा सिद्ध पदार्थ, असा आहे ;

(छ) " न्यायिक सदस्य " याचा अर्थ, या अधिनियमा अन्वये तशा नियुक्त केलेल्या न्यायाधिकरणाचा एक सदस्य, असा आहे ; आणि त्यात, कलम १०, पोटकलम (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अर्हतांपैकी कोणतीही अर्हता धारण करणाऱ्या अध्यक्षाचा किंवा उपाध्यक्षाचा समावेश आहे ;

(ज) " सदस्य " याचा अर्थ, न्यायाधिकरणाचा (मग तो न्यायिक असो किंवा तांत्रिक असो) सदस्य, असा आहे आणि त्यात, अध्यक्ष आणि एक उपाध्यक्ष यांचा समावेश आहे ;

(झ) " अधिसूचना " याचा अर्थ, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेली अधिसूचना, असा आहे ;

(ञ) " विहित " याचा अर्थ, या अधिनियमाखाली तयार केलेल्या नियमांद्वारे विहित, असा आहे ;

(ट) " नियम " याचा अर्थ, या अधिनियमान्वये तयार केलेले नियम, असा आहे ;

(ठ) " तांत्रिक सदस्य " याचा अर्थ, खंड (छ) च्या अर्थानुसार जो न्यायिक सदस्य नाही असा न्यायाधिकरणाचा सदस्य, असा आहे ;

(ड) " न्यायाधिकरण " याचा अर्थ कलम ८ अन्वये स्थापन केलेले राष्ट्रीय पर्यावरण न्यायाधिकरण, असा आहे ;

(ढ) " उपाध्यक्ष " याचा अर्थ, न्यायाधिकरणाचा उपाध्यक्ष, असा आहे ;

**स्पष्टीकरण.**—दोन किंवा अधिक उपाध्यक्ष असलेल्या न्यायाधिकरणाच्या संबंधात, या अधिनियमातील उपाध्यक्षाच्या संदर्भाचा अन्वयार्थ त्या उपाध्यक्षांमधील प्रत्येक उपाध्यक्षांचा संदर्भ असल्याप्रमाणे लावण्यात येईल.

(ण) " मालक " याचा अर्थ, अपघाताच्या वेळी कोणताही घातक पदार्थ ज्या व्यक्तीच्या मालकीचा असेल किंवा तो हाताळणे ज्याच्या नियंत्रणाखाली असेल अशी व्यक्ती, असा आहे आणि त्यात,—

(एक) एखाद्या भागीदारी संस्थेच्या संबंधात, तिच्या भागीदारांपैकी कोणताही भागीदार ;

(दोन) एखाद्या संघाच्या संबंधात, त्याच्या सदस्यांपैकी कोणताही सदस्य ; आणि

(तीन) एखाद्या कंपनीच्या संबंधात, अशा कंपनीचा व्यवसाय चालविण्यासाठी कंपनीचा प्रत्यक्ष प्रभार असलेला व कंपनीला जबाबदार असा तिचा कोणताही संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारी,

यांचा समावेश असेल.

## प्रकरण दोन

## एखाद्या व्यक्तीचा मृत्यू, तिला झालेली इजा आणि मालमत्ता व पर्यावरण यांची हानी यासाठी नुकसानभरपाई

दोष नसतानाही काही विवक्षित प्रकरणात तत्त्वतः नुकसानभरपाई देण्याचे दायित्व.

**३.** (१) जेव्हा कोणत्याही अपघातामुळे कोणत्याही व्यक्तीचा (एखाद्या कामगाराव्यतिरिक्त अन्य) मृत्यू झाला असेल किंवा तिला इजा झाली असेल किंवा कोणत्याही मालमत्तेची किंवा पर्यावरणाची हानी झाली असेल तेव्हा, मालक, अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेल्या सर्व किंवा कोणत्याही शीर्षांअन्वये असा मृत्यू, इजा किंवा हानी यासाठी नुकसानभरपाई देण्यास पात्र असेल.

(२) पोटकलम (१) अन्वये नुकसानभरपाईसाठी केलेल्या कोणत्याही मागणीमध्ये मागणीदाराला, ज्यासंबंधात मागणी केली आहे असा मृत्यू, इजा किंवा हानी, कोणत्याही व्यक्तीच्या कोणत्याही दोषपूर्ण कृतीमुळे, दुर्लक्षामुळे किंवा कसुरीमुळे झाली, हे वादप्रतिवादाने सिद्ध करण्याची आवश्यकता असणार नाही.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनार्थ,—

(एक) "कामगार" या शब्दाला, कामगार भरपाई अधिनियम, १९२३ (१९२३ चा ८), यामध्ये नेमून दिलेला अर्थ असेल ;

(दोन) "इजा" यात, एखाद्या अपघातातून उद्‌भवलेली कायमस्वरूपी संपूर्ण किंवा कायमस्वरूपी आंशिक विकलांगता किंवा आजार यांचा समावेश आहे ;

(३) एखाद्या अपघाताने झालेल्या मृत्यूचा, इजेचा किंवा हानीचा कारणसंबंध जर कोणत्याही व्यक्तीच्या कृतीशी लावता येणार नसेल, परंतु, जर ती बाब, संयुक्तपणे केलेल्या किंवा अशा अनेक कृतीच्या कार्यांच्या आणि प्रक्रियेच्या परिणामी घडून आली असेल तर, न्यायाधिकरण अशी कृती, कार्य व प्रक्रिया यांसाठी जे जबाबदार आहेत त्यांच्यावर नुकसानभरपाईचे दायित्व समन्यायाने वाटून देईल.

४. (१) नुकसानभरपाईसाठी मागणी करण्याचा अर्ज.— नुकसानभरपाईच्या मागणीबाबतचा अर्ज.

(क) जिला कायम स्वरूपात इजा झाली आहे अशा व्यक्तीकडून ;

(ख) ज्या मालमत्तेची हानी झाली आहे अशा मालमत्तेच्या मालकाकडून ;

(ग) जेथे अपघातातून मृत्यू झाला असेल तेथे अशा मृत व्यक्तीच्या सर्व किंवा कोणत्याही कायदेशीर प्रतिनिधीकडून ;

(घ) अशा व्यक्तीने किंवा अशा मालमत्तेच्या मालकाने किंवा, यथास्थिति, मृत व्यक्तीच्या सर्व किंवा कोणत्याही कायदेशीर प्रतिनिधीने योग्य रीतीने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही एजंटकडून ;

(ङ) अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेल्या सर्व किंवा कोणत्याही शीर्षाखाली, केंद्र सरकारकडून याबाबत मान्यता दिलेल्या आणि पर्यावरणाच्या क्षेत्रात काम करणाऱ्या कोणत्याही प्रतिनिधिक संस्थेकडून किंवा संघटनेकडून ;

(च) अनुसूचीत विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या सर्व किंवा कोणत्याही शीर्षाखाली, केंद्र सरकारकडून किंवा एखाद्या राज्य शासनाकडून किंवा एखाद्या स्थानिक प्राधिकरणाकडून ; करता येईल :

परंतु, जर मृत व्यक्तीचे सर्व कायदेशीर प्रतिनिधी नुकसानभरपाईच्या अशा कोणत्याही अर्जात सहभागी झाले नाहीत तर, मृत व्यक्तीच्या सर्व कायदेशीर प्रतिनिधींच्या वतीने किंवा त्यांच्या लाभासाठी, अर्ज करता येईल आणि अशा सहभागी न झालेल्या कायदेशीर प्रतिनिधींना अर्जाचे उत्तरवादी म्हणून खटल्यात सहभागी केले जाईल.

(२) न्यायाधिकरणास, जर योग्य वाटले तर, त्यास नुकसानभरपाईच्या मागणीसाठीचा खटला स्वाधिकारे हाती घेता येईल.

(३) पोटकलम (१) अन्वये अर्ज करणाऱ्या कोणत्याही मागणीदारास लोकदायित्व विमा अधिनियम, १९९१ (१९९१ चा ६) मध्ये तरतूद केली आहे त्याप्रमाणे अशा सहाय्यासाठी न्यायाधिकरणाकडेदेखील अर्ज करता येईल :

परंतु, जर मागणीदाराला आधीच सहाय्य मिळालेले असेल किंवा उक्त अधिनियमा अन्वये जिल्हाधिकाऱ्याकडे मागणीदाराने केलेला अर्ज प्रलंबित असेल आणि मागे घेण्यात आला नसेल तर असा अर्ज करता येणार नाही.

(४) न्यायाधिकरणाला, लोकदायित्व विमा अधिनियम, १९९१ (१९९१ चा ६) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या बाबींच्या संबंधात जिल्हाधिकाऱ्याला ज्या अधिकारिता, अधिकार आणि प्राधिकार असतात आणि ज्यांचा त्याला वापर करता येतो त्याच अधिकारिता, अधिकार व प्राधिकार असतील व त्याचा त्याला वापर करता येईल आणि या प्रयोजनासाठी, या अधिनियमाच्या तरतुदी, त्यातील जिल्हाधिकाऱ्याच्या संदर्भाचा अर्थ, न्यायाधिकरणाच्या संदर्भात समावेश असल्याप्रमाणे लावण्यात येईल, या फेरबदलाच्या अधीन राहून अंमलात राहतील.

(५) पोटकलम (१) खालील प्रत्येक अर्ज न्यायाधिकरणाकडे करण्यात येईल, आणि त्यात विहित करण्यात येईल त्याप्रमाणे, तशा तपशिलाचा अंतर्भाव असेल आणि तसे दस्तऐवज आणि एक हजार रुपयांपेक्षा अधिक नसेल अशी फी त्यासोबत देण्यात येईल :

परंतु, जिचे वार्षिक उत्पन्न विहित मर्यादेपेक्षा कमी आहे अशा व्यक्तीकडून किंवा पोटकलम (१) च्या खंड (च) मध्ये निर्दिष्ट केलेल्या संस्थेकडून किंवा संघटनेकडून किंवा केंद्र सरकारकडून, राज्य शासनाकडून किंवा एखाद्या स्थानिक प्राधिकरणाकडून कोणतीही फी देय नसेल ;

(६) अपघाताच्या घटनेपासून पाच वर्षांच्या आत नुकसानभरपाईचा अर्ज करण्यात आला असल्याखेरीज असा कोणताही अर्ज विचारार्थ स्वीकारण्यात येणार नाही.

न्यायाधिकरणाची कार्यपद्धती व अधिकार.

५. (१) कलम ४ च्या पोट-कलम (१) अन्वये अर्ज मिळाल्यानंतर, न्यायाधिकरणास त्याला योग्य वाटेल अशा चौकशीनंतर, तडकाफडकी अर्ज फेटाळता येईल.

(२) जेव्हा न्यायाधिकरणाने, पोटकलम (१) अन्वये अर्ज फेटाळला नसेल तेव्हा, न्यायाधिकरण, मालकाला अर्जाची सूचना दिल्यानंतर आणि पक्षकारांना त्यांचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, मागणीबाबत किंवा मागण्यांपैकी प्रत्येक मागणीबाबत चौकशी करील आणि ज्यांना अशी नुकसानभरपाईची रक्कम प्रदान करण्यात येईल, अशा व्यक्तीचा किंवा व्यक्तींचा विनिर्देश करणारा आणि त्याला न्याय असल्याचे वाटेल इतकी नुकसानभरपाईची रक्कम निर्धारित करणारा निवाडा देईल.

(३) न्यायाधिकरण, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ (१९०८ चा ५) याद्वारे ठरवून दिलेल्या कार्यपद्धतीस बांधील नसेल. परंतु, नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वाचे मार्गदर्शन घेईल आणि या अधिनियमाच्या आणि कोणत्याही नियमांच्या अन्य तरतुदीना अधीन राहून, न्यायाधिकरणाला त्याच्या चौकशीसाठी, जागा आणि वेळा निश्चित करण्यासह त्याची स्वतःची कार्यपद्धती विनियमित करण्याचा अधिकार असेल.

(४) न्यायाधिकरणाला, या अधिनियमा अन्वये त्याची कार्ये पार पाडण्याच्या प्रयोजनार्थ, दिवाणी न्यायालयाकडे एखादा खटला चालविताना, खालील बाबींच्या संबंधात, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ (१९०८ चा ५) अन्वये निहित असलेल्या अधिकारांसारखेच अधिकार असतील :—

(क) कोणत्याही व्यक्तीला समन्स काढून बोलावणे व उपस्थित राहण्यास भाग पाडणे आणि शपथेवर तिची तपासणी करणे ;

(ख) दस्तऐवजांचा शोध घेण्यास व ते सादर करण्यास फर्माविणे ;

(ग) शपथपत्रावर साक्ष घेणे ;

(घ) भारतीय साक्षीपुरावा अधिनियम, १८७२ (१८७२ चा १) याची कलमे १२३ व १२४ यांच्या तरतुदीच्या अधिनतेने, कोणत्याही कार्यालयातून कोणत्याही सरकारी अभिलेखांची किंवा दस्तऐवजांची किंवा त्यांच्या प्रतीची मागणी करणे ;

(ङ) साक्षीदारांच्या किंवा दस्तऐवजांच्या तपासणीसाठी आयोगपत्रे काढणे ;

(च) आपल्या निर्णयाचे पुर्नविलोकन करणे ;

(छ) अर्ज फेटाळणे किंवा त्यावर एकतर्फी कार्यवाही करणे किंवा निर्णय देणे ;

(ज) कसुरीसाठी कोणताही अर्ज फेटाळल्याबाबतचा कोणताही आदेश किंवा त्याने एकतर्फी दिलेला कोणताही आदेश बाजूला ठेवणे ; आणि

(झ) विहित करावयाची किंवा विहित करता येईल अशी कोणतीही अन्य बाब.

अंतरिम आदेश देण्याबाबतच्या शर्ती.

६. या अधिनियमाच्या किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही अन्य कायद्याच्या कोणत्याही अन्य तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी,—

(क) ज्याच्या विरुद्ध असा अर्ज करण्यात आला आहे किंवा करावयाचे प्रस्तावित केले आहे अशा पक्षकाराला, अर्जाच्या प्रती आणि अशा अंतरिम आदेशाच्या युक्तीवादाच्या पुष्टीदाखल सर्व दस्तऐवजांच्या प्रती दिल्याखेरीज ; आणि

(ख) अशा पक्षकारांना त्या प्रकरणाबाबत त्यांचे म्हणणे ऐकून घेण्याबाबतची संधी दिल्याखेरीज ;

अर्जाबाबत किंवा अर्जाशी संबंधित कोणत्याही कार्यवाहीमध्ये कोणताही अंतरिम आदेश (आदेशाच्या रूपात किंवा स्थगन आदेशाच्या रूपात किंवा अन्य कोणत्याही रीतीने) काढण्यात येणार नाही :

परंतु, न्यायाधिकरण, खंड (क) आणि (ख) च्या आवश्यकता काढून टाकू शकेल आणि ज्याची पैशातून पर्याप्त रीतीने भरपाई होऊ शकत नाही अशी अर्जदाराची होणारी कोणतीही हानी किंवा नुकसान रोखण्यासाठी तसे करणे आवश्यक आहे याबाबत न्यायाधिकरणाचे समाधान झाले तर, लेखी स्वरूपात त्याची कारणे नमूद करून, ते, अपवादात्मक उपाययोजना म्हणून एखादा अंतरिम आदेश काढू शकेल. परंतु, कोणताही अंतरिम आदेश, जर तो आधीच

रद्द झाला नाही तर, ज्या तारखेस तो काढण्यात आला असेल त्या तारखेपासून चौदा दिवसांच्या कालावधीच्या समाप्तीनंतर, उक्त आवश्यकतांचे त्या कालावधीच्या समाप्तीच्या पूर्वी अनुपालन करण्यात आलेले नसल्यास आणि न्यायाधिकरणाने अंतरिम आदेशाची अंमलबजावणी पुढे चालू ठेवलेली नसल्यास, तो अंमलात असल्याचे बंद होईल.

**कोणत्याही अन्य कायद्यान्वये प्रदान केलेल्या सहाय्याची रक्कम कमी करणे.**

७. जेव्हा कोणत्याही व्यक्तीचा मृत्यू किंवा तिला झालेली इजा किंवा कोणत्याही मालमत्तेचे नुकसान यासंबंधात या अधिनियमान्वये नुकसानभरपाई देण्यास पात्र असलेला मालक हा, लोक दायित्व विमा अधिनियम, १९९१ (१९९१ चा ६) अन्वये सहाय्य म्हणून कोणतीही रक्कम किंवा कोणत्याही अन्य कायद्याअन्वये कोणतीही अन्य नुकसानभरपाई देण्यास देखील पात्र असेल तेव्हा, या अधिनियमान्वये देय असलेली नुकसानभरपाईची रक्कम, सहाय्याच्या रकमेइतकी व अन्य कोणत्याही कायद्यान्वये दिलेल्या अन्य नुकसानभरपाईच्या रकमेइतकी कमी करण्यात येईल.

## प्रकरण तीन

## राष्ट्रीय पर्यावरण न्यायाधिकरण आणि त्याची न्यायपीठे यांची स्थापना

**राष्ट्रीय पर्यावरण न्यायाधिकरणाची स्थापना.**

८. केंद्र सरकार, अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये प्रदान करण्यात आलेली अधिकारिता, अधिकार आणि प्राधिकार यांचा वापर करण्यासाठी राष्ट्रीय पर्यावरण न्यायाधिकरण म्हणून ओळखण्यात येणाऱ्या एका न्यायाधिकरणाची स्थापना करील.

**न्यायाधिकरण व त्याची न्यायपीठे यांची रचना.**

९. (१) न्यायाधिकरण, अध्यक्ष आणि केंद्र सरकारला योग्य वाटतील इतक्या संख्येतील उपाध्यक्ष, न्यायिक सदस्य आणि तांत्रिक सदस्य यांचे मिळून बनलेले असेल, आणि न्यायाधिकरणाची अधिकारिता, अधिकार आणि प्राधिकार यांचा वापर या अधिनियमाच्या अन्य तरतुदींना अधीन राहून, त्यांच्या न्यायपीठांनादेखील करता येईल.

(२) या अधिनियमाच्या अन्य तरतुदींना अधीन राहून, न्यायपीठ हे, एक न्यायिक सदस्य आणि एक तांत्रिक सदस्य यांचे मिळून बनलेले असेल.

(३) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, अध्यक्षास,—

(क) ज्यासाठी त्याची नियुक्ती केली आहे अशा न्यायपीठाच्या न्यायिक सदस्याची किंवा तांत्रिक सदस्याची कार्ये पार पाडण्याव्यतिरिक्त, इतर कोणत्याही न्यायपीठाच्या न्यायिक सदस्याची किंवा, यथास्थिति, तांत्रिक सदस्याची कार्ये पार पाडता येतील ;

(ख) उपाध्यक्ष किंवा अन्य सदस्याची एका न्यायपीठातून अन्य न्यायपीठाकडे बदली करता येईल ;

(ग) एखाद्या न्यायपीठावर नियुक्त केलेला उपाध्यक्ष, न्यायिक सदस्य किंवा तांत्रिक सदस्य याला, अन्य न्यायपीठाचा उपाध्यक्ष किंवा, न्यायिक सदस्य किंवा यथास्थिति, तांत्रिक सदस्य याची कार्ये पार पाडण्यास प्राधिकृत करता येईल ; आणि

(घ) कोणत्याही प्रकरणाचा किंवा प्रकरणांचा निर्णय, त्यात अंतर्भूत असलेल्या प्रश्नांचे स्वरूप विचारात घेता, त्याच्या मते किंवा, केंद्र सरकारने त्याबाबत केलेल्या नियमांन्वये दोनपेक्षा अधिक सदस्यांनी मिळून बनलेल्या एखाद्या न्यायपीठाकडून घेतला जाणे आवश्यक असेल तर, तसे होत असल्याची सुनिश्चिती करण्यासाठी, त्याला योग्य वाटतील असे सर्वसाधारण किंवा विशेष आदेश देता येतील :

परंतु, या खंडाच्या अनुसार, स्थापन केलेल्या प्रत्येक न्यायपीठात, किमान एका न्यायिक सदस्याचा आणि एका तांत्रिक सदस्याचा समावेश असेल.

(४) या कलमाच्या पूर्वगामी तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत केलेले असेल तरी, अध्यक्ष किंवा याबाबत अध्यक्षाने अधिकृत केलेला कोणताही अन्य सदस्य हा, एका सदस्याने बनलेले एखादे न्यायपीठ म्हणून कार्य करण्यास आणि अध्यक्ष, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करील अशा खटल्याच्या वर्गाच्या संबंधातील किंवा अशा खटल्याच्या वर्गाशी संबंधित असलेल्या अशा बाबींच्या संबंधातील न्यायाधिकरणाची अधिकारिता, अधिकार आणि प्राधिकार यांचा वापर करण्यास सक्षम असेल :

परंतु असे की, कोणत्याही अशा खटल्याच्या किंवा बाबींच्या सुनावणीच्या कोणत्याही टप्प्यावर, जर अध्यक्षाला किंवा अशा सदस्याला असे आढळून आले की, तो खटला किंवा बाब ही, अशा

स्वरूपाची आहे की, दोन सदस्यांनी मिळून बनलेल्या न्यायपीठाकडून त्याची सुनावणी होणे आवश्यक आहे तर तो खटला किंवा ती बाब, अध्यक्ष त्याला योग्य वाटेल अशा न्यायपीठाकडे हस्तांतरित करील किंवा हस्तांतरित करण्यासाठी त्यांच्याकडे ती निर्देशित करण्यात येईल.

(५) या अधिनियमाच्या अन्य तरतुदींना अधीन राहून, न्यायाधिकरणाची, न्यायपीठे सर्वसाधारणतः नवी दिल्ली येथे असतील (ज्याला प्रधान न्यायपीठ म्हणून ओळखण्यात येईल) आणि केंद्र सरकार अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा अन्य ठिकाणी असतील.

**अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष किंवा अन्य सदस्य म्हणून नियुक्ती होण्यासाठी अर्हता.**

१०. (१) एखादी व्यक्ती,—

(क) एखाद्या उच्च न्यायालयाची किंवा सर्वोच्च न्यायालयाची न्यायाधीश असल्याखेरीज किंवा झालेली असल्याखेरीज ; किंवा

(ख) किमान दोन वर्षांसाठी तिने उपाध्यक्षाचे पद धारण केलेले असल्याखेरीज, अध्यक्ष म्हणून नियुक्त होण्यास अर्हताप्राप्त ठरणार नाही.

(२) एखादी व्यक्ती,—

(क) एखाद्या उच्च न्यायालयाची न्यायाधीश असल्याखेरीज किंवा न्यायाधीश झालेली असल्याखेरीज, किंवा

(ख) भारत सरकारच्या एखाद्या सचिवाचे पद किंवा भारत सरकारच्या एखाद्या सचिवापेक्षा कमी नसेल अशा एखाद्या वेतनश्रेणीत येणारे असे, केंद्र सरकारच्या किंवा एखाद्या राज्य शासनाच्या अधिपत्याखालील कोणतेही पद किमान दोन वर्षांसाठी धारण केलेले असल्याखेरीज ; किंवा

(ग) (एक) भारत सरकारच्या अपर सचिवाचे पद किंवा भारत सरकारच्या अपर सचिवापेक्षा कमी नसेल अशा एखाद्या वेतनश्रेणीत येणारे असे, केंद्र सरकारच्या किंवा एखाद्या राज्य शासनाच्या अधिपत्याखालील कोणतेही अन्य पद, किमान पाच वर्षांसाठी धारण केलेले असल्याखेरीज ;

(दोन) पर्यावरणाशी संबंधित समस्यांच्या कायदेविषयक, प्रशासकीय, वैज्ञानिक किंवा तांत्रिक पैलूंबाबत पुरेसे ज्ञान किंवा अनुभव असल्याखेरीज ; किंवा

(घ) न्यायिक सदस्य किंवा एक तांत्रिक सदस्य म्हणून किमान तीन वर्षांसाठी पद धारण केलेले असल्याखेरीज ;

उपाध्यक्ष म्हणून नियुक्त होण्यास अर्हताप्राप्त ठरणार नाही.

(३) एखादी व्यक्ती,—

(क) एखाद्या उच्च न्यायालयाची न्यायाधीश असल्याखेरीज किंवा झालेली असल्याखेरीज किंवा न्यायाधीश होण्यास अर्हताप्राप्त असल्याखेरीज ; किंवा

(ख) भारतीय कायदेविषयक सेवेची सदस्य असल्याखेरीज आणि तिने किमान तीन वर्षांसाठी त्या सेवेच्या श्रेणी एकमधील एखादे पद धारण केलेले असल्याखेरीज,

न्यायिक सदस्य म्हणून नियुक्ती होण्यास अर्हताप्राप्त ठरणार नाही.

(४) कोणत्याही व्यक्तीकडे पर्यावरणाशी संबंधित समस्यांच्या प्रशासनिक, वैज्ञानिक किंवा तांत्रिक पैलूंविषयी पुरेसे ज्ञान किंवा अनुभव असल्याखेरीज किंवा त्याबाबत कार्यवाही करण्याची क्षमता असल्याखेरीज ती व्यक्ती तांत्रिक सदस्य म्हणून नियुक्ती होण्यास अर्हताप्राप्त ठरणार नाही.

(५) पोटकलम (६) आणि (७) याच्या तरतुदींना अधीन राहून, न्यायाधिकरणाचा अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि अन्य प्रत्येक सदस्याची नेमणूक राष्ट्रपतीकडून करण्यात येईल.

(६) अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष म्हणून या कलमात विनिर्दिष्ट केलेली अर्हता धारण करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीची नेमणूक भारताच्या मुख्य न्यायमूर्तीशी विचारविनिमय केल्याशिवाय करण्यात येणार नाही.

(७) केंद्र सरकारकडून नियुक्त केलेल्या व खालील व्यक्तींची मिळून बनलेल्या निवड समितीच्या शिफारशींखेरीज, कोणत्याही व्यक्तीची न्यायिक सदस्य किंवा एक तांत्रिक सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात येणार नाही :—

(क) न्यायाधिकरणाचा अध्यक्ष .. समितीचा अध्यक्ष, पदसिद्ध

(ख) भारत सरकारच्या पर्यावरण व वन मंत्रालयाचा सचिव. .. सदस्य, पदसिद्ध

(ग) भारत सरकारच्या विधि, न्याय व कंपनी कार्य (वैधानिक कार्य विभाग) मंत्रालयाचा सचिव. .. सदस्य, पदसिद्ध

(घ) महासंचालक, वैज्ञानिक व औद्योगिक संशोधन परिषद .. सदस्य, पदसिद्ध

(ङ) केंद्र सरकारद्वारे नामनिर्देशित करावयाचा पर्यावरणतज्ज्ञ .. सदस्य.

**विवक्षित परिस्थितीत उपाध्यक्षाने, अध्यक्ष म्हणून काम पाहणे किंवा त्याची कर्तव्ये पार पाडणे.**

**११.** (१) अध्यक्षाचे पद त्याचा मृत्यू, राजीनामा या कारणाने किंवा अन्यथा रिक्त झाल्याच्या प्रसंगी, यथास्थिति, उपाध्यक्ष, किंवा केंद्र सरकार त्याबाबत अधिसूचनेद्वारे प्राधिकृत करील अशा उपाध्यक्षांपैकी एखादा उपाध्यक्ष, हा या अधिनियमाच्या तरतुदींनुसार नियुक्त केलेला नवीन अध्यक्ष त्या पदावर रूजू होण्याच्या तारखेपर्यंत, अध्यक्ष म्हणून काम पाहील.

(२) जेव्हा अध्यक्ष, अनुपस्थिती, आजारपण किंवा अन्य कोणतेही कारण यामुळे त्यांची कार्ये पार पाडण्यास असमर्थ ठरला असेल तेव्हा, उपाध्यक्ष किंवा, यथास्थिति, केंद्र सरकार अधिसूचनेद्वारे त्याबाबत प्राधिकृत करील अशा उपाध्यक्षांपैकी एक उपाध्यक्ष हा, अध्यक्ष त्याच्या पदावर रूजू होण्याच्या तारखेपर्यंत अध्यक्षाची कार्ये पार पाडील.

**पदावधी.**

**१२.** अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि अन्य सदस्य हा, त्याच्या पदावर दाखल झाल्याच्या तारखेपासून पाच वर्षांच्या कालावधीसाठी पद धारण करील, परंतु तो आणखी पाच वर्षांच्या कालावधीसाठी पुनर्नियुक्त होण्यास पात्र असेल :

परंतु, कोणताही अध्यक्ष, उपाध्यक्ष किंवा अन्य सदस्य, हा—

(क) अध्यक्षाच्या बाबतीत, वयाची सत्तर वर्षे पूर्ण झाल्यावर ;

(ख) उपाध्यक्षाच्या बाबतीत, वयाची पासष्ट वर्षे पूर्ण झाल्यावर ; आणि

(ग) कोणत्याही अन्य सदस्याच्या बाबतीत, वयाची बासष्ट वर्षे पूर्ण झाल्यावर ते पद धारण करणार नाहीत.

**राजीनामा व पदावरून काढून टाकणे.**

**१३.** (१) अध्यक्ष, उपाध्यक्ष किंवा अन्य सदस्य यास, राष्ट्रपतीला संबोधून स्वतःच्या सहीनिशी लेखी नोटिशीद्वारे, त्याच्या पदाचा राजीनामा देता येईल :

परंतु, अध्यक्ष, उपाध्यक्ष किंवा अन्य सदस्य हा, त्याचे पद लवकर सोडून देण्याची त्याला राष्ट्रपतीने परवानगी दिली असल्याखेरीज, अशी नोटीस मिळाल्याच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या समाप्तीपर्यंत किंवा त्याचा उत्तराधिकारी म्हणून रीतसर नेमणूक झालेल्या व्यक्तीने-आपले पद ग्रहण करीपर्यंत किंवा त्याच्या पदाचा कालावधी समाप्त होईपर्यंत-यांपैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत पद धारण करणे चालू ठेवील.

(२) ज्या प्रकरणी अध्यक्षाला, उपाध्यक्षाला किंवा अन्य सदस्याला, त्याच्या विरूद्धच्या दोषारोपाची माहिती देण्यात आली असून, त्या दोषारोपाच्या संबंधात आपले म्हणणे मांडण्याची एक वाजवी संधी देण्यात आली असेल अशा प्रकरणी, सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशाने केलेल्या चौकशीनंतर, जर अक्षमता किंवा गैरवर्तन सिद्ध झाल्याच्या आधारे, राष्ट्रपतीने आदेश दिला असेल तर ते खेरीजकरून एरव्ही अध्यक्ष, उपाध्यक्ष किंवा कोणताही अन्य सदस्य याला त्याच्या पदावरून काढून टाकण्यात येणार नाही.

(३) केंद्र सरकार, नियमाद्वारे, पोटकलम (२) मध्ये निर्देशिलेल्या अध्यक्ष, उपाध्यक्ष किंवा अन्य सदस्य याचे गैरवर्तन किंवा अक्षमता याच्या अन्वेषणाची कार्यपद्धती विनियमित करील.

**अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि अन्य सदस्य यांचे वेतन व भत्ते आणि सेवेच्या अन्य अटी व शर्ती.**

**१४.** अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि अन्य सदस्य यांना देय असलेले वेतन व भत्ते आणि सेवेच्या अन्य अटी व शर्ती (निवृत्तिवेतन, उपदान आणि इतर सेवानिवृत्तीचे लाभ यांसह) विहित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील :

परंतु, अध्यक्ष, उपाध्यक्ष किंवा अन्य सदस्य यांचे वेतन व भत्ते किंवा सेवेच्या अन्य अटी व शर्ती यांमध्ये त्यांचे अहित होईल अशा रीतीने बदल त्याच्या नियुक्तीनंतर करण्यात येणार नाहीत.

असा अध्यक्ष, इत्यादी असण्याचे बंद झाल्यावर अध्यक्ष, इत्यादींनी पद धारण करण्यासंबंधीची तरतूद.

**१५.** पद धारण करण्याचे बंद झाल्यानंतर,—

(क) न्यायाधिकरणाचा अध्यक्ष हा, केंद्र सरकारच्या नियंत्रणाखाली किंवा एखाद्या राज्य शासनाच्या नियंत्रणाखाली पुन्हा नोकरी करण्यास अपात्र असेल.

(ख) न्यायाधिकरणाचा उपाध्यक्ष हा, या अधिनियमाच्या अन्य तरतुदींच्या अधीनतेने, न्यायाधिकरणाचा अध्यक्ष म्हणून नियुक्त होण्यास पात्र असेल. परंतु, केंद्र सरकारच्या नियंत्रणाखालील किंवा एखाद्या राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील कोणत्याही अन्य नोकरीस तो पात्र असणार नाही.

(ग) न्यायाधिकरणाचा (अध्यक्ष किंवा उपाध्यक्षांव्यतिरिक्त) एखादा सदस्य, या अधिनियमाच्या अन्य तरतुदींच्या अधीनतेने, त्या न्यायाधिकरणाचा अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष म्हणून नेमणूक होण्यास किंवा कोणत्याही अन्य न्यायाधिकरणाचा अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष म्हणून नेमणूक होण्यास पात्र असेल परंतु, केंद्र सरकारच्या नियंत्रणाखालील किंवा एखाद्या राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील कोणतीही नोकरी करण्यास पात्र असणार नाही.

(घ) अध्यक्ष, उपाध्यक्ष किंवा अन्य सदस्य, न्यायाधिकरणापुढे उपस्थित होणार नाही, कृती करणार नाही किंवा वाद-प्रतिवाद करणार नाही.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनार्थ, केंद्र सरकारच्या नियंत्रणाखालील किंवा एखाद्या राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील नोकरी यात, भारताच्या राज्य क्षेत्रातील किंवा भारत सरकारच्या नियंत्रणाखालील कोणत्याही स्थानिक किंवा अन्य प्राधिकरणातील किंवा शासनाच्या मालकीच्या किंवा नियंत्रणाखालील कोणत्याही महामंडळ किंवा संस्थेतील नोकरीचा अंतर्भाव होतो.

अध्यक्षाचे आर्थिक व प्रशासनिक अधिकार.

**१६.** अध्यक्ष, नियमान्वये त्याच्याकडे निहित करण्यात येतील अशा आर्थिक व प्रशासनिक अधिकारांचा वापर न्यायपीठांच्या बाबतीत करील :

परंतु, अध्यक्षाला, न्यायाधिकरणाच्या उपाध्यक्षाकडे किंवा कोणत्याही अन्य अधिकाऱ्याकडे, त्याला योग्य वाटतील असे त्याचे आर्थिक व प्रशासनिक अधिकार सोपविण्याचा प्राधिकार असेल, परंतु त्यासाठी अशी शर्त असेल की, असा अध्यक्ष किंवा असा अधिकारी अशा सोपविलेल्या अधिकारांचा वापर करताना, अध्यक्षाच्या निदेशनाखाली, नियंत्रणाखाली व पर्यवेक्षणाखाली काम करणे चालू ठेवील.

न्यायाधिकरणाचा कर्मचारीवर्ग.

**१७.** (१) केंद्र सरकार, न्यायाधिकरणाला त्याची कार्ये पार पाडण्यात सहाय्य होण्यास आवश्यक असणाऱ्या अधिकाऱ्यांचे आणि अन्य कर्मचाऱ्यांचे स्वरूप व संवर्ग निश्चित करील आणि त्याला योग्य वाटतील असे अधिकारी आणि अन्य कर्मचारी न्यायाधिकरणाला पुरवील.

(२) न्यायाधिकरणाचे अधिकारी आणि अन्य कर्मचारी, अध्यक्षाच्या सर्वसाधारण अधीक्षणाखाली त्यांची कार्य पार पाडतील.

(३) न्यायाधिकरणाच्या अधिकाऱ्यांचे आणि कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते आणि सेवेच्या शर्ती, विहित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील.

कामकाजाचे न्यायपीठांमध्ये वितरण.

**१८.** (१) जेव्हा न्यायाधिकरणाच्या कोणत्याही न्यायपीठांची रचना करण्यात येईल तेव्हा, केंद्र सरकार, वेळोवेळी, अधिसूचनेद्वारे न्यायाधिकरणाच्या कामकाजाचे न्यायपीठांमध्ये वितरण करण्यासाठी तरतूद करील आणि प्रत्येक न्यायपीठाने कोणती प्रकरणे हाताळावीत हे विनिर्दिष्ट करील.

(२) जर, एखाद्या न्यायापीठाकडे नेमून दिलेल्या कामकाजाच्या कक्षेत एखादे प्रकरण येते किंवा कसे, याबाबत कोणताही प्रश्न उद्‌भवला तर, अध्यक्षाचा निर्णय अंतिम असेल.

**स्पष्टीकरण.**—शंका निरसनासाठी, याद्वारे असे घोषित करण्यात येत आहे की, " प्रकरण " या शब्दप्रयोगात, अंतरिम सहाय्याच्या अर्जाचा समावेश असेल.

## प्रकरण चार

## न्यायाधिकरणाची अधिकारिता व कार्यपद्धती

अधिकारितेस आडकाठी.

**१९.** या अधिनियमाच्या आरंभी व तेव्हापासून न्यायाधिकरणाव्यतिरिक्त कोणत्याही न्यायालयाला किंवा अन्य प्राधिकरणाला न्यायाधिकरणाकडून ज्याबाबत कार्यवाही केली जाईल

किंवा हाताळण्यात येतील अशा कोणत्याही नुकसानभरपाईच्या दाव्याबाबतचा कोणताही अर्ज हाताळण्याची किंवा कार्यवाही करण्याची कोणतीही अधिकारिता, अधिकार किंवा प्राधिकार असणार नाही किंवा त्याचा वापर करण्यास ते हक्कदार असणार नाही.

**एका न्यायपीठाकडून अन्य न्यायपीठाकडे खटल्याचे हस्तांतरण करण्याचे अध्यक्षाचे अधिकार.**

**२०.** अध्यक्ष, कोणत्याही पक्षकाराच्या अर्जावरून आणि पक्षकाराला नोटीस दिल्यानंतर आणि ज्यांचे म्हणणे ऐकण्याची त्याची इच्छा असेल अशांचे म्हणणे ऐकल्यानंतर किंवा अशी नोटीस न देता स्वतःहून एखाद्या न्यायपीठापुढे प्रलंबित असणारा कोणताही खटला निकालासाठी कोणत्याही अन्य न्यायपीठाकडे हस्तांतरित करू शकेल.

**निर्णय बहुमताने घेण्यात येईल.**

**२१.** जर एखाद्या न्यायपीठाच्या सदस्यांमध्ये कोणत्याही मुद्यावर मतभेद असेल तर, त्या मुद्यावर बहुमताने निर्णय घेण्यात येईल. जर तेथे बहुमत नसेल तर, परंतु, जर सदस्यांची मते समसमान असतील तर, ते सदस्य ज्याबाबत त्यांच्यात मतभेद आहे असा मुद्दा किंवा मुद्दे नमूद करतील आणि अध्यक्षाकडे निर्णयार्थ सोपवतील. अध्यक्ष एकतर स्वतः मुद्याची किंवा मुद्यांची सुनावणी करील किंवा असा मुद्दा किंवा मुद्दे यांची सुनावणी करण्यासाठी एका किंवा अधिक अन्य सदस्यांकडे ते प्रकरण निर्दिष्ट करील आणि ज्यांनी त्याची पहिल्यांदा सुनावणी केली आहे अशा सदस्यांसह ज्यांनी त्या खटल्याची सुनावणी केली आहे अशा सदस्यांच्या बहुमतानुसार अशा मुद्यावर किंवा मुद्यांवर निर्णय घेण्यात येईल.

**पर्यावरणाच्या हानीसाठी देय असलेली रक्कम जमा करणे.**

**२२.** (१) जेव्हा न्यायाधिकरणाच्या कोणत्याही निवाड्यानुसार पर्यावरणाच्या कोणत्याही हानीबद्दल नुकसानभरपाईची कोणतीही रक्कम प्रदान करावयाचा आदेश दिलेला असेल तेव्हा, लोकदायित्व विमा अधिनियम, १९९१ (१९९१ चा ६) यांच्या कलम ७ क चे पोटकलम (३) अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या प्राधिकरणाकडे त्या रकमेचा भरणा करण्यात येईल आणि त्या कलमान्वये स्थापन केलेल्या पर्यावरण सहाय्य निधीत ती रक्कम जमा करण्यात येईल.

(२) पोटकलम (१) अन्वये पर्यावरण सहाय्य निधीत जमा केलेल्या नुकसानभरपाईच्या रकमेचा, विहित करण्यात येईल अशा व्यक्तींकडून किंवा प्राधिकरणाकडून अशा रीतीने आणि अशा प्रयोजनांसाठी वापर करण्यात येईल.

**न्यायाधिकरणाच्या निवाड्याची किंवा आदेशाची अंमलबजावणी.**

**२३.** (१) या अधिनियमांन्वये न्यायाधिकरणाने दिलेला एखादा निवाडा, दिवाणी न्यायालयाच्या एखाद्या हुकूमनाम्याप्रमाणे न्यायाधिकरणाकडून अंमलबजावणीयोग्य असेल आणि या प्रयोजनार्थ, न्यायाधिकरणाला, दिवाणी न्यायालयाचे सर्व अधिकार असतील.

(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, न्यायाधिकरण, जेथे अपघात घडून आला आहे त्या क्षेत्रावर अधिकारिता असणाऱ्या जिल्हाधिकाऱ्याकडे, लोकदायित्व विमा अधिनियम, १९९१ (१९९१ चा ६) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे सहाय्याच्या प्रदानासाठी त्याने काढलेल्या आदेशाची प्रत पाठवील आणि जिल्हाधिकारी, जणू काही त्या अधिनियमांन्वये त्याच्याकडून तो आदेश काढण्यात आला आहे, अशा रीतीने आदेशाची अंमलबजावणी करील.

(३) न्यायाधिकरणाने ज्याच्याविरुद्ध निवाडा किंवा आदेश दिला आहे असा मालक, जेव्हा त्या निवाड्यात किंवा आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत न्यायाधिकरणाने निदेश दिल्याप्रमाणे रकमेचे प्रदान करण्यात किंवा ती जमा करण्यास कसूर करील तेव्हा अशी रक्कम, जमीन महसुलाची किंवा सार्वजनिक मागणीची थकबाकी म्हणून त्या मालकाकडून वसुलीयोग्य असेल.

**अपिले.**

**२४.** (१) पोटकलम (१) मध्ये तरतूद केली असेल त्याखेरीज आणि दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ (१९०८ चा ५) मध्ये किंवा कोणत्याही अन्य कायद्यात काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, त्या संहितेच्या कलम १०० मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या एका किंवा अधिक कारणांवरून सर्वोच्च न्यायालयाकडे, न्यायाधिकरणाचा वादकालीन आदेश नसेल अशा कोणत्याही निवाड्याविरुद्ध किंवा अन्य आदेशाविरुद्ध अपील दाखल करता येईल.

(२) पक्षकारांच्या संमतीने न्यायाधिकरणाने दिलेल्या निवाड्याच्या किंवा अन्य आदेशाच्या विरुद्ध अपील दाखल करता येणार नाही.

(३) या कलमाखालील प्रत्येक अपील हे, ज्या विरुद्ध अपील केले आहे अशा निवाड्याच्या किंवा अन्य आदेशाच्या तारखेपासून नव्वद दिवसांच्या कालावधीच्या आत करण्यात येईल :

परंतु, जिला अशा निवाड्याच्या अटींनुसार कोणतीही रक्कम देणे आवश्यक आहे अशा व्यक्तीने केलेले अपील, सर्वोच्च न्यायालयाने निदेश दिलेल्या रीतीने अशा निवाड्यात दिलेली रक्कम तिने जमा केल्याशिवाय सर्वोच्च न्यायालयाकडून विचारार्थ स्वीकारले जाणार नाही :

परंतु, आणखी असे की, सर्वोच्च न्यायालयाची जर अशी खात्री पटली की, अपीलकाराला वेळेवर अपील दाखल करण्यास पुरेशा कारणाने प्रतिबंध झाला होता तर, सर्वोच्च न्यायालय, नव्वद दिवसांच्या उक्त कालावधीच्या समाप्तीनंतर अपील दाखल करून घेईल.

## प्रकरण पाच

## संकीर्ण

**न्यायाधिकरणाच्या आदेशाचे पालन करण्यात कसूर झाल्यास शास्ती.**

**२५.** न्यायाधिकरणाने दिलेल्या कोणत्याही आदेशाचे पालन करण्यात जो कोणी कसूर करील तो, तीन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या कालावधीच्या कारावासाच्या शिक्षेस किंवा दहा लाख रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडास किंवा दोन्हीस पात्र ठरेल.

**कंपन्यांनी केलेले अपराध.**

**२६.** (१) जेव्हा या अधिनियमाखालील एखादा अपराध एखाद्या कंपनीकडून घडून आला असेल तेव्हा, असा अपराध ज्यावेळी घडला त्यावेळी कंपनीचे कामकाज चालविण्यास कंपनीस प्रत्यक्षपणे प्रभारी असलेली आणि जबाबदार असलेली प्रत्येक व्यक्ती, त्याचबरोबर कंपनीदेखील त्या अपराधाबाबत दोषी असल्याचे समजण्यात येईल आणि त्याविरुद्ध कार्यवाही होण्यास व त्यानुसार शिक्षा होण्यास ती पात्र असेल :

परंतु, या पोटकलमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे अशी कोणतीही व्यक्ती जर अपराध तिला माहीत नसताना झाला होता किंवा असा अपराध घडण्यास प्रतिबंध करण्यासाठी तिने सर्व खबरदारी घेतली होती, असे तिने सिद्ध केले तर, या अधिनियमात तरतूद केलेली कोणतीही शिक्षा देण्यास ती पात्र ठरवली जाणार नाही.

(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, जेव्हा या अधिनियमाखालील एखादा अपराध एखाद्या कंपनीकडून झाला असेल आणि कंपनीचा कोणताही संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारी यांच्या संमतीने किंवा मूकसंमतीने झाला आहे किंवा त्यांच्याकडून कोणतेही दुर्लक्ष झाल्याच्या कारणाने असा अपराध घडला आहे असे सिद्ध झाले असेल तेव्हा, असा संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अन्य अधिकारी हे, त्या अपराधाबाबत दोषी असल्याचे समजण्यात येईल आणि त्यांच्याविरुद्ध कार्यवाही केली जाण्यास आणि त्यानुसार शिक्षा होण्यास ते पात्र असतील.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनार्थ—

(क) "कंपनी" याचा अर्थ, कोणताही निगमनिकाय, असा आहे आणि त्यात, एखादी भागीदारी संस्था किंवा व्यक्तींचा संघ याचा समावेश होतो ; आणि

(ख) एखाद्या भागीदारी संस्थेच्या संबंधात "संचालक" याचा अर्थ, भागीदारी संस्थेतील एक भागीदार, असा आहे.

**न्यायाधिकरणापुढील कार्यवाही ही न्यायिक कार्यवाही असेल.**

**२७.** न्यायाधिकरणापुढील सर्व कार्यवाही ही, भारतीय दंड संहितेच्या (१८६० चा ४५) कलमे १९३, २१९ आणि २२८ याच्या अर्थांतर्गत न्यायिक कार्यवाही असल्याचे समजण्यात येईल.

**न्यायाधिकरणाचे सदस्य आणि कर्मचारी हे लोकसेवक असणे.**

**२८.** न्यायाधिकरणाचा अध्यक्ष, उपाध्यक्ष व इतर सदस्य आणि अधिकारी आणि इतर कर्मचारी हे, भारतीय दंड संहिता, १८६० (१८६० चा ४५) याच्या कलम २१ च्या अर्थानुसार लोकसेवक असल्याचे समजण्यात येईल.

**सद्भावनेने केलेल्या कृतीस संरक्षण.**

**२९.** या अधिनियमानुसार किंवा त्याखालील तयार केलेले कोणतेही नियम किंवा आदेश यांनुसार सद्भावनेने केलेल्या किंवा करावयाचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही गोष्टीसाठी केंद्र सरकारविरुद्ध किंवा न्यायाधिकरणाचा अध्यक्ष, उपाध्यक्ष किंवा अन्य सदस्य यांच्याविरुद्ध किंवा अध्यक्ष, उपाध्यक्ष किंवा अन्य सदस्य यांनी प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अन्य व्यक्तींविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा अन्य कायदेशीर कार्यवाही दाखल करता येणार नाही.

**३०.** लोक दायित्व विमा अधिनियम, १९९१ (१९९१ चा ६) मध्ये तरतूद केलेली असेल ते खेरीजकरून, या अधिनियमाच्या तरतुदी, त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात किंवा या अधिनियमाव्यतिरिक्त इतर कोणत्याही कायद्याच्या आधारे अंमलात असणाऱ्या कोणत्याही संलेखात त्याविरुद्ध कोणत्याही विसंगत बाबी असल्या तरीही प्रभावी असतील. **अधिनियमाचा अधिभावी प्रभाव असणे.**

**३१.** (१) केंद्र सरकारला, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी अधिसूचनेद्वारे, नियम करता येतील. **नियम करण्याचा अधिकार.**

(२) विशेषतः आणि पूर्वगामी अधिकारांच्या सर्वसाधारणतेला बाध न पोहचवता, या नियमांनी, पुढील सर्व बाबींसाठी किंवा त्यापैकी कोणत्याही बाबीसाठी तरतुदी करता येतील, त्या अशा,—

(क) अर्जात अंतर्भूत असावयाचा तपशील, त्याबरोबर जोडावे लागतील असे दस्तावेज व फी आणि कलम ४ च्या पोटकलम (५) अन्वये कोणतीही फी दिल्याशिवाय अर्ज करणे एखाद्या व्यक्तीला शक्य होण्यासाठी त्या व्यक्तीच्या वार्षिक उत्पन्नाच्या मर्यादा ;

(ख) कलम ५, पोटकलम (४) च्या खंड (झ) अन्वये ज्याबाबत न्यायाधिकरणाला दिवाणी न्यायालयाचे अधिकारी असतील अशी कोणतीही बाब ;

(ग) कलम ९, पोटकलम (३) च्या खंड (घ) अन्वये, ज्या प्रकरणामधील किंवा प्रकरणांमधील अंतर्भूत प्रश्नांचे स्वरूप लक्षात घेता, दोनपेक्षा अधिक सदस्य असणाऱ्या एखाद्या न्यायपीठाकडून त्याचा निर्णय होणे आवश्यक असेल असे प्रकरण किंवा प्रकरणे ;

(घ) कलम १३, पोटकलम (३) अन्वये न्यायाधिकरणाचा अध्यक्ष, उपाध्यक्ष किंवा इतर सदस्य यांची गैरवर्तणूक किंवा अक्षमता याच्या तपासाची कार्यपद्धती ;

(ङ) कलम १४ अन्वये, अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि इतर सदस्य यांना देय असलेले वेतन व भत्ते आणि सेवेच्या इतर अटी आणि शर्ती ;

(च) कलम १६ अन्वये अध्यक्षाचे न्यायपीठाबाबतचे वित्तीय व प्रशासकीय अधिकार ;

(छ) कलम १७, पोटकलम (३) अन्वये न्यायाधिकरणाचे अधिकार व अन्य कर्मचारीवर्ग यांचे वेतन व भत्ते आणि सेवेच्या शर्ती ;

(ज) पर्यावरणीय सहाय्यता निधीत जमा केलेल्या नुकसानभरपाईच्या रकमेचा, ज्या व्यक्तीकडून किंवा प्राधिकरणाकडून ज्या रीतीने ज्या पर्यावरणविषयक प्रयोजनांसाठी कलम २२ च्या पोटकलम (२) अन्वये वापर करण्यात येईल; ती व्यक्ती किंवा प्राधिकरण, ती रीत आणि ते प्रयोजन ; आणि

(झ) जी विहित करणे आवश्यक असेल किंवा करता येईल अशी कोणतीही अन्य बाब.

(३) या अधिनियमाखाली केलेला प्रत्येक नियम करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, ते सत्रासीन असताना, एका सत्राने बनलेल्या अथवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरिता ठेवला जाईल आणि जर पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी त्या नियमात कोणतेही फेरबदल करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले किंवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, त्यानंतर तो नियम अशा फेरबदल केलेल्या रूपातच परिणामक होईल किंवा, यथास्थिति, मुळीच परिणामक होणार नाही तथापि, अशा कोणत्याही फेरबदलामुळे किंवा शून्यीकरणामुळे, तत्पूर्वी त्या नियमाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

**अनुसूची**

[कलम ३ (१) पहा]

ज्या शीर्षाखाली नुकसानभरपाईच्या मागणीसाठी दावा करता येईल अशी शीर्षे,—

(क) मृत्यू ;

(ख) कायमस्वरूपी, तात्पुरती, संपूर्ण किंवा आंशिक अशी विकलांगता किंवा अन्य इजा किंवा आजार ;

(ग) संपूर्ण किंवा आंशिक अशी विकलांगता किंवा कायमस्वरूपी, किंवा तात्पुरती विकलांगता यामुळे वेतनाचे नुकसान ;

(घ) इजा किंवा आजार यावरील उपचारासाठी झालेला वैद्यकीय खर्च ;

(ङ) खाजगी मालमत्तेचे नुकसान ;

(च) बाधित व्यक्तींना सहाय्य, मदत पुरविण्यासाठी आणि त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी शासनाने किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाने केलेला खर्च ;

(छ) पर्यावरणीय ऱ्हासासाठी भरपाई आणि पर्यावरणाच्या दर्जाची पुनःस्थापना यासह, कोणतीही हानी किंवा नुकसान भरून काढण्यासाठी किंवा कोणत्याही प्रशासकीय किंवा कायदेशीर कारवाईसाठी शासनाने केलेला खर्च ;

(ज) कोणतेही नुकसान करणाऱ्या कृतीमुळे झालेली किंवा त्याच्याशी संबंधित असलेली शासनाची किंवा स्थानिक प्राधिकरणाची हानी ;

(झ) जलचर प्राणी व दुभती व ओझी ओढणारी जनावरे यांसह प्राण्यांना झालेली कोणतीही इजा, हानी किंवा त्यांचा नाश याबाबतच्या हक्कमागण्या ;

(ञ) जलचर वनस्पती, पिके, भाजीपाला, झाडे आणि फळबागा यांसह वनस्पतींचे झालेले कोणतेही नुकसान, हानी किंवा नाश याबाबतच्या हक्कमागण्या ;

(ट) माती, हवा, पाणी, जमीन आणि नैसर्गिक यंत्रणा यांसह पर्यावरणाची झालेली कोणतीही हानी किंवा नुकसान पूर्ववत करण्याचा खर्च यांसह केलेल्या हक्कमागण्या ;

(ठ) खाजगी मालमत्तेव्यतिरिक्त कोणत्याही मालमत्तेचे नुकसान आणि हानी ;

(ड) धंद्याचे किंवा रोजगाराचे किंवा दोन्हींचे नुकसान ;

(ढ) घातक पदार्थ हाताळण्याच्या कोणत्याही कार्याशी संबंधित किंवा त्यातून उद्भवलेली कोणतीही अन्य हक्कमागणी.

# THE NATIONAL ENVIRONMENT TRIBUNAL ACT, 1995

## राष्ट्रीय पर्यावरण न्यायाधिकरण अधिनियम, १९९५

### ईंग्रजी-मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| affected person | बाधित व्यक्ती | [schedule (*f*)] |
| award | निवाडा | [section 23 (*3*)] |
| bench | न्यायपीठ | [section 18 (*1*)] |
| charge | दोषारोप | [section 13 (*2*)] |
| claim | हक्कमागणी | [schedule (*n*)] |
| collection | संग्रह करणे | [section 2 (*e*)] |
| conversion | रूपांतरण | [section 2 (*e*)] |
| destruction | नाश करणे | [section 2 (*e*)] |
| environmental degradation | पर्यावरणीय ऱ्हास | [schedule (*g*)] |
| environmentalist | पर्यावरण तज्ज्ञ | [Section 10 (*7*) (*e*)] |
| exceptional measure | अपवादात्मक उपायोजना | [section 6 proviso] |
| hazardous substance | घातक पदार्थ | [long title] |
| incapacity | अक्षमता | [section 13(*2*)] |
| injury | इजा | [section 3 (*2*) explanation (*ii*)] |
| in session | सत्रासीन | [section 31 (*3*)] |
| judicial member | न्यायिक सदस्य | [section 2 (*g*)] |
| micro-organism | सूक्ष्मजीव | [section 2 (*d*)] |
| milch and draught animals | दुभती व ओझी ओढणारी जनावरे | [schedule (*i*)] |
| misbehaviour | गैरवर्तन | [section 13 (*2*)] |
| offence | अपराध | [section 26 (*1*)] |
| package | आवेष्टित करणे | [section 2 (*e*)] |
| partial disability | आंशिक विकलांगता | [section 3 explanation (*ii*)] |
| preparations | सिद्धपदार्थ | [section 2 (*f*)] |
| processing | संस्करण करणे | [section 2 (*e*)] |
| property | जीवनसंपत्ती | [section 2 (*d*)] |
| radio-activity | किरणोत्सारण | [section 2 (*a*)] |
| restoration | पुनःस्थापना | [schedule (*g*)] |
| storage | साठवण | [section 2 (*e*)] |
| strict liability | काटेकोर दायित्व | [long title] |
| suo motu | स्वाधिकारे | [section 4 (*2*)] |
| technical member | तांत्रिक सदस्य | [section 2 (*n*)] |
| transfer | हस्तांतरण | [section 2 (*e*)] |
| treatment | प्रक्रिया | [section 2 (*e*)] |
| unintended | अहेतुकपणे | [section 2 (*a*)] |
| victims of pollution | प्रदूषणाचे बळी | [preamble] |
| wrongful act | दोषपूर्ण कृती | [section 3 (*2*)] |

# राष्ट्रीय पर्यावरण न्यायाधिकरण अधिनियम, १९९५

# THE NATIONAL ENVIRONMENT TRIBUNAL ACT, 1995

## मराठी-इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| अक्षमता | incapacity | [कलम १३(२)] |
| अपराध | offence | [कलम २६ (१)] |
| अपवादात्मक उपायोजना | exceptional measures | [कलम ६ परंतुक] |
| अहेतुकपणे | unintended | [कलम २ (क)] |
| आवेष्टित करणे | package | [कलम २ (ङ)] |
| आंशिक विकलांगता | partial disability | [कलम ३ स्पष्टीकरण (दोन)] |
| इजा | injury | [कलम ३ (२) स्पष्टीकरण (दोन)] |
| काटेकोर दायित्व | strict liability | [पूर्ण शीर्षक] |
| किरणोत्सारण | radio-activity | [कलम २ (क)] |
| गैरवर्तन | misbehaviour | [कलम १३ (२)] |
| घातक पदार्थ | hazardous substance | [पूर्ण शीर्षक] |
| जीवनसंपत्ती | property | [कलम २ (घ)] |
| तांत्रिक सदस्य | technical member | [कलम २ (ढ)] |
| दुभती व ओझी ओढणारी जनावरे | milch and draught animals | [अनुसूची (एक)] |
| दोषपूर्ण कृती | wrongful act | [कलम ३(२)] |
| दोषारोप | charge | [कलम १३ (२)] |
| नाश करणे | destruction | [कलम २ (ङ)] |
| निवाडा | award | [कलम २३ (३)] |
| न्यायपीठ | bench | [कलम १८ (१)] |
| न्यायिक सदस्य | judicial member | [कलम २ (छ)] |
| पर्यावरण तज्ज्ञ | environmentalist | [कलम १० (७) (ङ)] |
| पर्यावरणीय ऱ्हास | environmental degradation | [अनुसूची (छ)] |
| पुनःस्थापना | restoration | [अनुसूची (छ)] |
| प्रक्रिया | treatment | [कलम २ (ङ)] |
| प्रदूषणाचे बळी | victims of pollution | [उद्देशिका] |
| बाधित व्यक्ती | affected person | [अनुसूची (च)] |
| रूपांतरण | conversion | [कलम २ (ङ)] |
| सत्रासीन | in session | [कलम ३१ (३)] |
| साठवण | storage | [कलम २ (ङ)] |
| सिद्धपदार्थ | preparation | [कलम २ (च)] |
| सूक्ष्मजीव | micro-organism | [कलम २ (घ)] |
| संग्रह | collection | [कलम २ (ङ)] |
| संस्करण करणे | processing | [कलम २ (ङ)] |
| स्वाधिकारे | suo motu | [कलम ४ (२)] |
| हक्कमागणी | claim | [अनुसूची (ढ)] |
| हस्तांतरण | transfer | [कलम २ (ङ)] |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई